महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.मासं/मावक /न.क्र.४४/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
प्लॉट न.१ धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
**email : cgmp@mahadiscom.in**
**website: www.mahadiscom.in**
**दुरध्वनी क्रमांक : ०२२-२४०१३५०५**
**फॅक्स क्रमांक : ०२२-२४०२५७६३**

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ३७८ दिनांक ०४/०१/२०१२

**विषय :** सरळसेवा भरतीमध्ये विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती करण्याबाबत.

**संदर्भ :** १) अवर सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०००३२ यांचे शासन निर्णय क्रमांक -बीसीसी-२०११/ प्र.क्र.१०६४ /२०११/ १६-ब , दिनांक १२ डिसेंबर २०११.
२) कक्ष अधिकारी , उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय , मुंबई यांचे पत्र क्र. बीसीसी - २००९ /प्र.क्र. २९१/०९/१६-ब दि. ५ नोव्हेंबर २००९ .
३) प्रशासकीय परिपत्रक क्र. २७४ दि. ०४/०१/२०१०.

-------

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - बीसीसी -२००९/प्र.क्र. २९१/०९/१६-ब दिनांक ५ नोव्हेंबर २००९ मधील क्रमांक ७ मध्ये शासनाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत. " मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती अथवा पदोन्नती देत असताना जात वैधता प्रमाणपत्र असल्याखेरीज यापुढे नियुक्ती अथवा पदोन्नती देण्यात येऊ नये."

२) आता, या संदर्भात उप सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०००३२ यांचे शासन निर्णय क्रमांक बीसीसी -२०११/ प्र.क्र. १०६४/२०११ /१६-ब दिनांक १२ डिसेंबर २०११ अन्वये सरळसेवा भरतीमध्ये विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर ' जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून,' तात्पुरती नियुक्ती करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्याचे निर्देश सर्व नियुक्ती अधिका-यांना दिले आहेत. सदरचे आदेश, " याचीका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपीबाबत जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधिन राहून" उपरोक्त आदेश रहातील. ( सोबत शासन निर्णयाची प्रत माहितीस्तव जोडण्यात येत आहे.)

३) शासन निर्णयातील सूचना / तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी होण्यासाठी सर्व संबंधित अधिका-यांनी दिनांक १२ डिसेंबर २०११ च्या शासन निर्णयाचे अवलोकन करावे व सदर निर्णयाचे सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

४) सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

(विजय भि. बागुल)
**मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.)**

**शासन परिपत्रक दिनांक ५.११.२००९ मधील क्रमांक ७ च्या आदेशास मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्याने सुधारित आदेश निर्गमित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १२ डिसेंबर, २०११

**वाचा:** शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:बीसीसी २००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५ नोव्हेंबर, २००९.

**प्रस्तावना :-**

शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:बीसीसी २००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ मधील क्रमांक ७ मध्ये शासनाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-
"मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती अथवा पदोन्नती देत असताना जात वैधता प्रमाणपत्र असल्याखेरीज यापुढे नियुक्ती अथवा पदोन्नती देण्यात येवू नये."

याचिका क्र.२१३६/२०११ श्रीकांत चंद्रकांत सैदाणे विरुध्द महाराष्ट्र शासन यासह एकूण १५ याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५ ऑगस्ट २०११ रोजी दिलेल्या आदेशान्वये शासन परिपत्रक दि.५.११.२००९ मधील क्रमांक ७ पुढील आदेश रद्द ठरविले आहेत.

**शासन निर्णय :-**

मा.उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेश विचारात घेवून शासन खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे :-

१) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:बीसीसी २००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ मधील क्रमांक ७ मध्ये शासनाने दिलेले आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

२) सरळसेवाभरतीमध्ये ज्या उमेदवाराची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारास, त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती करण्याबाबत नियुक्ती प्राधिकाऱ्याने आदेश निर्गमित करावेत.

३) नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. त्याने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिका-यास सादर करावी. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार, संबंधित जात पडताळणी समितीने उमेदवारांचे जात पडताळणीचे प्रस्ताव सहा महिन्यांच्या आत निकाली काढावेत. जात पडताळणी समितीने त्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले, तर त्यास दिलेले

नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करावेत, आणि त्या उमेदवाराविरुध्द नियुक्ती प्राधिकाऱ्याने महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यातील तरतुदीनुसार त्वरीत कारवाई करावी.

याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५ ऑगस्ट २०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यात आली आहे, यावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील, त्या आदेशाच्या अधीन राहून उपरोक्त आदेश राहतील.

सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या सर्व अधिनस्त कार्यालयांच्या निदर्शनास सदर शासन निर्णय आणून द्यावा.

प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी सर्व जात पडताळणी समित्यांना वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निदेश द्यावेत व जात पडताळणी समित्यांकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा त्यांनी दरमहा आढावा घ्यावा, आढावा घेण्यात आल्यानंतर मासिक प्रगती अहवाल प्रधान सचिव (सा.वि.स.), सामान्य प्रशासन विभाग यांना पाठवावा.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक२०१११२२८१०२२२२१२२२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सु. ना. रणखांबे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि आदिवासी विकास विभाग
यांच्या अंतर्गत असलेल्या सर्व जात पडताळणी समित्यांचे सदस्य सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,